

# श्रीज्ञानेश्वरी

## अध्याय दहावा

या अध्यायाला विभुतीयोग असे नांव आहे. सर्व जग मीच व्यापले आहे असे भगवंत सांगतात. पण मी तुला कोणत्या  कोणत्या रुपात पहावे, ओळखावे  हे स्पष्ट करण्याकरता तुम्ही आपल्या विभुती मला सांगा असे अर्जुन भगवंतास विनवितो . येथे भगवंतांनी आपल्या प्रधान 75 विभूती सांगितल्या आहेत म्हणून या अध्यायास विभुतीयोग म्हणतात.

यात 42 श्लोक असून त्यावर 335 ओव्या आहेत. यातील 118,298,307 या ओव्या सुंदर आहेत. 24 ते 49 या ओव्यापर्यंत गीतेच्या व पर्यायाने ज्ञानेश्वरीच्या पूर्वखंडाचे म्हणजे 1 त 9 या अध्यायांचे महत्व विशद करतात आणि ते करतांना 9व्या अध्यायाचे महत्वपण स्पष्ट करतात.

या अध्यायाच्या प्रारंभी, फक्त येथेच, महाराजांनी संस्कृत शब्दांचा श्रीनिवृत्तीनाथांची स्तुती करता 1 ते 5 ओव्यामध्ये  उपयोग केला आहे .या सर्व ओव्या समजण्यास कठीण आहेत व त्यांचा अर्थ पण  अध्यायाचे शेवटी दिला आहे म्हणून या ओव्यातील कठीण शब्दांचा अर्थ पुनः वेगळा दिला नाही.

## श्रीज्ञानेश्वरी
## अध्याय 10 वा

नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा ।
पराप्रमेयप्रमदा । विलासिया ।।+1।।
नमो संसारतमसूर्या । अपरिमितपरमवीर्या ।
तरुणतरतूर्या ।लालनलीला ।।+2।।
नमो जगदखिलपालना । मंगळमणिनिधाना ।
सज्जनवनचंदना । आराध्यलिंगा ।।+3।।
नमो चतुर चित्तचकोरचंद्रा । आत्मानुभवनरेंद्रा ।
श्रुतिसारसमुद्रा ।मन्मथमन्मथा ।।+4।।
नमो सुभाव भजनभाजना । भवेभकुंभभंजना ।
विश्वोद्भवभुवना । श्रीगुरुराया ।।+5।।
तुमचा अनुग्रहो गणेशु । जै दे आपुला सौरसु [1] , ।
तै , सारस्वती प्रवेशु । बाळकाही आथी ।।6।।
जी दैविकी उदार वाचा । जै उद्देशु दे नाभिकाराचा [2] ।
तै , नवरससुधाब्धीचा । थावो लाभे ।।7।।
जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी,। जरी मुकेयाते अंगिकारी ।
तो वाचस्पतीशी करी । प्रबंधुहोडा [3] ।।8।।
हे असो; दिठी जयावरी झळके,। की,हा पद्मकरु माथां पारुखे [4] ।
तो जीवचि , परि तुके । महेशेसी ।।9।।
एवढे जिये महिमेचे करणे । ते वाचाबळे वानूं मी कवणे ।
का , सूर्याचिया आंगा उटणे । लागत असे ? ।।10।।
केउता कल्पतरुवरी फुलौरा ! ।कायसेनि पाहुणेरु क्षीरसागरा ! ।
कवणे वासी कापुरा । सुवासु देवो ! ।।11।।
चंदनाते कायसेनि चर्चावे ! । अमृताते केउते रांधावे ! ।
गगनावरी उभवावे [5] । घडे केवी [6] ?।।12।।
तैसे , श्रीगुरुचे महिमान ।आकळिते [7] के असे साधन ?।
हे जाणोनि , मिया नमन ।निवांत केले ।।13।।
जरी प्रज्ञेचेनि आथिलेपणे [8] । श्रीगुरुसामर्थ्या रुप करू म्हणे , ।
तरि ते मोतिया भिंग देणे [9]। तैसे होईल ।।14।।
का,साडेपंधरया रजतवणी [10] ।तैशी स्तुतीची बोलणी ।
उगियाचि माथा ठेविजे चरणी । हेचि भले ।।15।।

1 सामर्थ्य
2 अभय
3 पैजलावून वादविवाद करणे
4 स्थीर राहणे
5 अधीक उंच करावे
6 कसे शक्य आहे 7समजते
8 संपन्नतेने 9 अभ्रकाने मोत्याला चकाकी आणणे 10 उत्तम शंभर नंबरी सोन्याला चांदीचा मुलामा देणे

मग म्हणितले ' जी स्वामी । भलेनि ममत्वे देखिले तुम्ही ।
म्हणौनि , कृष्णार्जुनसंगमी । प्रयागवटु [1] जाहलो ।।16।।
मागा दूध दे म्हणतलियासाठी । आघविया क्षीराब्धीची करूनि वाटी ।
उपमन्युपुढे धूर्जटी [2] ।ठेविली जैसी ।।17।।
ना तरी , वैकुंठपीठनायके । रुसला ध्रुव , कवतिके ।
बुझाविला , देऊनि भातुके [3] । ध्रुवपदाचे ।।18।।
तैसी , जे ब्रह्मविद्यारावो [4] । सकल शास्त्रांचा विसंवता ठावो [5] ।
ते भगवद्गीता वोविये गावो । ऐसे केले ।।19।।
जे बोलणियाचे रानी हिंडता,। नायकिजे फळलिया अक्षराची वार्ता ।
परि , ते वाचाचि केली कल्पलता ।विवेकाची ।।+20।।
होती देहबुद्धी एकसरी [6] । ते आनंदभांडारा केली वोवरी [7] ।
मन गीतार्थसागरी ।जळशयन जाले ।।21।।
ऐसे , एकेक देवांचे करणे ,। ते अपार , बोलो केवी , मी जाणे , ।
तऱ्ही , अनुवादलो धीटपणे ।ते , उपसाहिजो जी ! ।।22।।
आता आपुलेनि कृपाप्रसादे । मिया भगवद्गीता वोवीप्रबंधे ।
पूर्वखंड विनोदे । वाखाणिले [8] ।।23।।
प्रथमी , अर्जुनाचा विषादु , । दुजी बोलिला , योगु विशदु ।
परि , सांख्यबुद्धीसि भेदु । दाऊनिया ।।24।।
तिजी , केवळ कर्म प्रतिष्ठिले । तेचि , चतुर्थी ज्ञानेशी प्रगटिले ।
पंचमी गव्हरिले [9] । योगतत्त्व ।।25।।
तेचि , षष्ठामाजी प्रगट । आसनालगोनि स्पष्ट ।
जीवात्मभाव एकवट । होती , जेणे ।।26।।
तैसी , जे योगस्थिती । आणि योगभ्रष्टा जे गती , ।
ते आघवीचि उपपत्ती । सांगितली षष्ठी ।।27।।
तयावरी , सप्तमी । प्रकृतिपरिहार उपक्रमी [10] ।
करुनि , भजती जे पुरुषोत्तमी । ते बोलिले चाऱ्ही [11] ।।28।।
पाठी सप्तप्रश्नविधि [12] । बोलोनि प्रयाणसमयसिद्धी ।
एवं सकळ वाक्यावधि । अष्टमाध्यायी; ।।29 ।।
मग शब्दब्रह्मी असंख्याके ।जेतुला काही अभिप्राय पिके , ।
तेतुला महाभारते , एके । लक्षे जोडे ।।30।।
तिये आघवांचि जे महाभारती, । ते लाभे कृष्णार्जुनवाचोक्ती ।
आणि जो अभिप्रावो सातेशती , । तो एकलाचि नवमी ।।31।।
म्हणौनि , नवमीचिया अभिप्राया । सहसा मुद्रा लावावया ।
बिहाला , मग मी वायां । गर्व कां करु ? ।।+32।।

1 गंगा यमुनेच्या संगमावर असणारा अक्षय वटवृक्ष
2 शंकराने
3 खाऊ
4 श्रेष्ठ ब्रह्मज्ञानविद्या
5 विश्रांती घेण्याचे ठिकाण
6 एकसारखी 7 खोली
8 हौसेने निरुपण केले
9 गूढपणे सांगणे
10 सुरवातीला प्रकृतीचा निरास
11 आर्ती,जिज्ञासु,अर्थार्थी,ज्ञानी
12 सात प्रश्नांचे व्याख्यान करून अध्यायाच्या अंतापर्यंत

| | |
|---|---|
| अहो ! गूळासाखरे मालयाचे [1] ।हे बांधे [2] , तरी एकाचि रसाचे । | 1 काकवी 2 तयार करणे |
| परि , स्वाद गोडियेचे । आन ,आन जैसे ।।33।। | |
| एक जाणोनिया बोलती , । एक ठाये ठावो[3] जाणविती । | 3 योग्य प्रकार |
| एक जाणो जाता , हारपती । जाणते गुणेशी ।।+34।। | |
| हे ऐसे अध्याय गीतेचे । परि अनिर्वाच्यपण नवमाचे । | |
| तो अनुवादलो , हे तुमचे । सामर्थ्य प्रभु ! ।।35।। | |
| अहो ! एकाची शाटी [4] तपिन्नली [5] । एकी सृष्टीवरी सृष्टी केली । | 4 छाटी 5 तप करणे |
| एकी पाषाणी वाऊनि [6] उतरली । समुद्री कटके [7] ।।36।। | 6 घालून 7 सैन्य |
| एकी आकाशी सूर्याते धरिले । एकी चुळीचि सागराते भरिले । | |
| तैसे , मज मुकयाकरवी बोलविले । अनिर्वाच्य तुम्ही ।।37।। | |
| परि हे असो ; एथ ऐसे , । राम रावण झुंजिन्नले कैसे ? । | |
| राम रावण जैसे । मीनले समरी ।।38।। | |
| तैसे , नवमी कृष्णाचे बोलणे , । ’ ते नवमीचियाचि ’ ऐसे मी म्हणे । | |
| या निवाडा [8] , तत्त्वज्ञु जाणे । जया गीतार्थु हाती ।।39।। | 8 वेगळेपण |
| एवं , नवही अध्याय पहिले । मिया मतीसारिखे वाखाणिले । | |
| आतां , उत्तरखंड उवाइले [9] ।ग्रंथाचे , ऐका ! ।।40।। | 9 सुरु झाले |
| जेथ विभूति प्रतिविभूति [10] । प्रस्तुत ,अर्जूना सांगिजेती । | 10 ईश्वरअंश असणाऱ्या |
| ते विदग्धा [11] रसवृत्ती । म्हणिपैल कथा ।।41।। | वस्तु 11 चातुर्यपणे |
| देशियेचेनि नागरपणे [12]। शांतु शृंगाराते जिणे । | 12 सुंदरपणा |
| तरि ओविया होती लेणे । साहित्यासि ।।42।। | |
| मूळग्रंथीचिया संस्कृता । वरि मऱ्हाठी नीट पढता , । | |
| अभिप्राय मानलिया उचिता,। कवण भूमी [13], हे न चोजवे[14]?।।43।। | 13 मूळ कोणते 14 हें |
| जैसे , अंगाचेनि सुंदरपणे , । लेणिया , आंगचि होय लेणे । | समजणे कठीण होईल |
| तेथ , अळंकारिले , कवण कवणे ! । हे निर्वचेना [15] ।।44।। | 15 निवडणे |
| तैसी , देशी आणि संस्कृत वाणी , । एका भावार्थाच्या सुखासनी । | |
| शोभती , आयणी [16]। चोखट [17] आइका ! ।।45।। | 16 चातूर्यार्ने 17 शुध्द |
| उठावलिया भावा , रुप ।करिता , रसवृतीचे लागे वडप [18] । | 18 वृष्टी |
| चातुर्य म्हणे , पडप [19]। जोडले आम्हां ।।46।। | 19 प्रतिष्टा |
| तैसे , देशियेचे लावण्य । हिरोनि आणिले तारुण्य । | |
| मग रचिले अगण्य । गीतातत्त्व ।।47।। | |
| जो चराचर परमगुरु । चतुर चित्तचमत्कारु । | |
| तो ऐका ! यादवेश्वरु । बोलता जाहला ।।48।। | |
| ज्ञानदेव निवृत्तीचा म्हणे , । ऐसे बोलिले श्रीहरी तेणे । | |
| ’ अर्जुना ! आघवियाची मातु अंतःकरणे ।धडौता[20] आहासि।।49।। | 20 योग्य झालास |

**श्रीभगवानुवाच**

**भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ।**
**यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ।।1।।**

**हे महाबाहो!माझ्या भाषणाने संतुष्ट होणाऱ्या तुला तुझ्या हितार्थ पुनश्च एक उत्तम गोष्ट मी आता सांगतो,ती ऐक.**

आम्ही मागील जे निरुपण केले , । ते तुझे अवधानचि पाहिले , ।
तंव टाचे [1] नव्हे , भले । पुरते आहे ।।50।। 1 अपुरे
घटी थोडेसे उदक घालिजें , । तेणे न गळे , तरी वरिता भरिजे ।
ऐसा परिसौनि पाहिलासि , तंव परिसविजे । ऐसेचि होतसे ।।51।।
अवचितयावरी सर्वस्व सांडिजे , । मग चोख , तरी तोचि भांडारी कीजे ।
तैसा , किरीटी ! तू आता माझें ।निजधाम कीं ! ।।52।।
ऐसे अर्जुना येउते , सर्वेश्वरे , । पाहोनि बोलिले अत्यादरे ।
गिरी देखोनि सुभरे [2] । मेघु जैसा , ।।53।। 2 चांगला भरलेला
तैसा , कृपाळुवांचा रावो । म्हणे , ' आइके गा माहाबाहो ।
सांगितलाचि अभिप्रावो । सांगेन पुढती ।।54।।
पै , प्रतिवर्षी क्षेत्र पेरिजे ।पिकाची जंव जंव वाढी देखिजे , ।
यालागी नुबगिजे[3] । वाहो करिता [4]।।55।। 3 कंटाळा 4 माशागत
पुढतपुढती , पुटे देता , । जोडे वानियेची अधिकता [5]। 5 कस वाढतो
म्हणौनि , सोने , पंडुसुता ! । शोधूचि आवडे ।।56।।
तैसे , एथ पार्था ! । तुज आभार नाही सर्वथा ।
आम्ही , आपुलियाचि स्वार्था । बोलो पुढती ।।57।।
जेसे , बाळका लेवविजे लेणे , ।तया शृंगारा बाळ काइ जाणे ? ।
परि , ते सुखाचे सोहळे भोगणे , । माउलिये दिठी ।।58।।
तैसें , तुझे हित आघवे । जंव , जंव , का तुज फावे , ।
तंव , तंव , आमुचे सुख दुणावे । ऐसे आहे ।।59।।
आता अर्जुना ! असो हे विकडी [6] । मज उघड तुझी आवडी । 6 अलंकारिक भाषण
म्हणौनि , तृप्तीची सवडी [7] । बोलता न पडे ।।60।। 7 समाप्ती
आम्हा येतुलियाची कारणे । तेचि ते तुजशी बोलणे ।
परि असो हे ; अंतःकरणे । अवधान देई ।।61।।
तरी ऐके गा सुवर्म [8]! । वाक्य माझे परम । 8 मर्मज्ञा
जे , अक्षरे लेऊनी परब्रह्म । तुज खेवासि आलें [9]।।62।। 9 मिठी देण्याकरिता आले
परी , किरीटी ! तू माते । नेणसी ना निरुते[10] । 10 स्पष्ट पणे
तरि, तो गा जो मी , एथे ।ते विश्वचि हे ।।63।।

**न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ।**
**अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ।।2।।**

**माझी उत्पत्ति देवांच्या गणांना आणि महर्षींनाहि कळत नाही; कारण देवांचे आणि महर्षींचे सर्व प्रकारे मीच आदिकारण आहे.**

एथ वेद मुके जाहाले , । मन , पवन पांगुळले ।
रातीविण , मावळले । रविशशी जेथ ।।64।।
अगा ! उदरीचा गर्भु , जैसा । न देखे आपुलिये मातेची वयसा , ।
मी आघवेया देवा तैसा , । नेणवे कांहीं ।।65।।
आणि , जळचरा उदधीचे मान [1] । मशका नोलांडवेचि गगन ।
तेवी , महर्षींचे ज्ञान । न देखेचि माते ।।66।।
मी कवण ? पां ! केतुला ? । कवणाचा ? कै जाहला ? ।
या निरुती करिता बोला [2], । कल्प गेले ।।67।।
कां ,जे महर्षी आणि या देवा , । येरा , भूतजाता सर्वा ।
मी आदि , म्हणौनि , पांडवा ! । अवघड जाणता ।।68।।
उतरले उदक पर्वत वळघे , ।जरी झाड वाढत मुळी लागे , ।
तरी , मिया जालेनि , जगे । जाणिजे माते ।।69।।
कां ,गाभेवने [3] वटु गिवसवे । जरी , तरंगी सागरु साठवे , ।
कां , परमाणूमाजी सामावे । भूगोलु हा ।।70।।
तरी , मिया जालिया जीवा , । महर्षी अथवा देवा ,।
माते जाणावया होआवा । अवकाशु [4] गा ! ।। 71 ।।
ऐसाही जरी विपाये , । सांडूनि पुढील पाये [5] ।
सर्वेंद्रियासि होये । पाठिमोरा जो ।।72।।
प्रवर्तलाही वेगी , बहुडे [6] । देह सांडूनि मागलीकडे ।
माहाभूतांचिया चढे । माथयावरी ।।73।।

1 मर्यादा
2 निर्णय करण्याचे चर्चेत
3 सूक्ष्म अंकुर
4 वेळ मिळेल
5 लौकिक प्रवृत्तिची पूढील चाल सोडून
6 मागे फिरणे

**यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ।**
**असंमुढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ।।3।।**

**मी पृथिव्यादि सर्व लोकांचा मोठा ईश्वर असून ,मला जन्म व आदि नाही असे जो जाणितो, तोच मनुष्यांमध्ये मोहविरहित होऊन सर्व पापापासून मुक्त होतो.**

तेथ राहोनि ठायठिके [7] । स्वप्रकाशे चोखे[8] , ।
अजत्व माझे देखे । आपुलिया डोळा ।।74।।

7 स्थीर 8 शुद्ध

मी आदीसि परु ।सकळलोकमहेश्वरु ।
ऐसिया माते जो नरु । यापरी जाणे , ।।75।।
तो पाषाणामाजी परिसु । जैसा रसाआंतु सिध्दरसु [1] । 1 अमृत
तैसा , मनुष्याआतु तो अंशु । माझाचि जाण ।।76।।
तो चालते ज्ञानाचे बिंब । तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ ।
येर माणुसपण , ते भांब [2] । लौकिक भागु ।।77।। 2 भास
अगा ! अवचिता कापुरा-। माजी सांपडला हिरा , ।
वरी पडिलिया नीरा । न निगे केवी ? ।।78।।
तैसा , मनुष्यलोकाआंतु । तो जरी जाहला प्राकृतु [3] । 3 देहधारी
तऱ्ही प्रकृतिदोषाची मातु [4]। नेणेचि की ! ।।79।। 4 गोष्ट
तो आपसयेचि [5]सांडिजे पापी । जैसा जळत चंदनु , सर्पी । 5 सहजपणे
तेवी माते जाणे , तो संकल्पी । वर्जूनि घापे[6] ।।80।। 6 मानसिक कर्मप्रवृत्ति
तेचि आमुते कैसे जाणिजे ? । ऐसे कल्पी जरी चित्त तुझे , । निश्चयपूर्वक सोडतो
तरी मी ऐसा , हे माझें । भाव ऐके ।।81।।
जे वेगळालिया भूती । सारिखे होऊनि , प्रकृती ।
विखुरले आहेती त्रिजगती । आघविये ।।82।।

**बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।**
**सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च ।।4।।**
**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।**
**भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ।।5।।**

**बुद्धि,ज्ञान,असंमोह,क्षमा,सत्य,दम,शम,सुख,दुःख,भव म्हणजे उद्भव,अभाव म्हणजे नाश तसेच भय आणि अभय,अहिंसा,समता,तुष्टि,संतोष,तप,दान,यश,अपयश इत्यादि अनेक प्रकारचे प्राणिमात्रांचे भाव माझ्याचपासून उत्पन्न होतात.**

तेथ प्रथम जाण बुद्धी । मग ज्ञान जे निरवधी [7] । 7 अमर्याद
असंमोह सहनसिद्धी [8]। क्षमा [9] सत्य ।।83।। 8 सहनशीलता 9 क्षमाभाव
मग शम दम दोन्ही ।सुखदुःख वर्ते जे जनी , ।
अर्जुना ! भावाभाव[10] , मानी । भावाचिमाजी ।। 84 ।। 10 होणे न होणे
पै, भय आणि निर्भयता । अहिंसा आणि समता ।
तुष्टि [11] तप पंडसुता ! । दान जे गा ! ।।85 ।। 11 संतोष
अगा ! यश , अपकीर्ती । हे जे भाव सर्वत्र दिसती , ।
ते मजचि पासूनि होती । भूतांचिया ठायी ।।86।।

जैसी भूते आहाति सिनानी , । तैसेचि हेही वेगळाले मानी ।
एक उपजती माझ्या ज्ञानी , । एक नेणती माते ।।87।।
प्रकाशु आणि कडवसे [1] । हे सूर्याचिस्तव जैसे । 1 अंधार
प्रकाश उदयी दिसें । तम अस्तुसी ।।88।।
आणि माझे जाणणे नेणणे , । ते तंव भूतांचिया दैवाचे करणे ।
म्हणौनि , भूती भावाचे होणे, । विषम पडे ।।89।।
यापरी माझिया भावी । हे जीवसृष्टि आहे आघवी ।
गुंतली , असे जाणावी । पंडुकुमरा ! ।।90।।
आतां इये सृष्टीचे पालक , । जया आधीन , वर्तती लोक , ।
ते अकरा भाव आणिक । सांगेन तुज ।।91।।

**महर्षयःसप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।**
**मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ।।6।।**

**सात महर्षि,पूर्वीचे चार मनु,ज्यांच्यापासून या लोकामध्ये ही प्रजा झाली,तेच माझेच मानस म्हणजे मनाने निर्माण केलेले भाव होत**

तरी आघवांचि गुणी वृद्ध । जें , महर्षीमाजी प्रबुद्ध [2] । 2 जाणते
कश्यपादि प्रसिद्ध । सप्तऋषी ।।92।।
आणिकही सांगिजतील । जे कां , चौदाआंतुल मुद्दल ।
स्वायंभु मुख्य वडील । चारी मनु ।। 93।।
ऐसे हे अकरा ।माझ्या मनी जाहाले धनुर्धरा ! ।
सृष्टिचिया व्यापारा-। लागोनियां ।। 94।।
जै लोकांची व्यवस्था न पडे,। जै या त्रिभुवनाचे काही न मांडे,[3]। 3 लोकांची रचना झाली नव्हती तीन्ही लोक रचले नव्हते
तै , महाभूतांचे दळवाडे[4] । अचुंबित असे[5] ।।95।।
तैचि हे जाहाले , । मग , इही लोक केले । 4 समुदाय 5 निष्क्रीय होते
तेथ अध्यक्ष रचूनि ठेविले । इही ,जन ।।96।।
म्हणौनि , अकराही हे राजा ! ।मग येर जग , यांचिया प्रजा ।
एवं , विश्वविस्तारु हा माझा । ऐसेचि जाण ।।97।।
पाहे पां ! आरंभी बीज एकले,। मग तेचि विरुढलिया,बूड जाहाले ।
बुडी कोंभ निघाले । खांदियांचे ।।98।।
खांदियापासूनि अनेका । फुटलिया नाना शाखा ।
शाखास्तव देखा । पल्लव पाने ।।99।।
पल्लवी फूल फळ । एवं , वृक्षत्व जाहाले सकळ ।
ते निर्धारिता , केवळ । बीजचि आघवे ।।100।।

तैसे मी एकचि पहिले ।मग, मी तेचि मनाते व्याले।
तेथ सप्तऋषि जाहाले।आणि चारी मनु।।101।।
इही लोकपाळ केले;।लोकपाळी विविध, लोक सृजिले।
लोकापासूनि निपजले।प्रजाजात।। 102।।
ऐसेनि हे विश्व येथे।मीचि विस्तारिलोसि निरुते।
परी, भावाचेनि हाते[6] ।माने जया[7] ।।103।।

6 भावांच्या उत्पत्ति द्वारे
7 त्याला समजते

**एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वत ः।**
**सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशय ः।।7।।**

**माझी ही विभूति म्हणजे विस्तार, आणि योग म्हणजे हा विस्तार करण्याची युक्ति अगर सामर्थ्य, यातील तत्त्व जो जाणितो ,त्याला स्थिर कर्मयोग प्राप्त होतो यात संशय नाही.**

यालागी सुभद्रापती ! ।हे भाव इया माझिया विभूती ।
आणि यांचिया व्याप्ती । व्यापिले जग ।। 104।।
म्हणौनि गा ! यापरी । ब्रह्मादिपिपीलिकावरी[8] ।
मीवाचूनि दुसरी । गोठी नाही ।। 105।।
ऐसे जाणे जो साचें , ।तया चेइरे [9] जाहाले ज्ञानाचे ।
म्हणौनि ,उत्तमाधम भेदाचे । दुःस्वप्न न देखे ।।106।।
मी , माझिया विभूती , । विभूती अधिष्ठिलिया व्यक्ती ।
हे आघवे , योगप्रतीती । एकचि मानी ।।107।।
म्हणौनि , निःशंके येणे महायोगे , । मज मीनला , मनाचेनि आंगे ।
एथ संशय करणे न लगे । तो त्रिशुद्धी जाहला ।।108।।
कां , जे ऐसे किरीटी ! । माते भजे जो अभेदा दिठी , ।
तयाचिये भजनाचे नाटी [10] ।सूती मज ।। 109।।
म्हणौनि,अभेदे जो भक्तियोगु ,। तेथ शंका नाही,नये खंगु [11] ।
करिता ठेला [12], तरी चांगु ,। ते सांगितले षष्ठी ।।110।।
तोचि अभेदु कैसा ? ।हे जाणावया , मानसा ।
साद जाली , तरी परियेसा , । बोलिजेल ।।111।।

8 ब्रह्मापासून मुंगीपर्यंत
9 जागृती
10 छंदात
11 कमीपणा न करिता
12 मरण पावला

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवतते ।**
**इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ।।8।।**

**मी सर्वांचे उत्पत्तिस्थान,व माझ्या पासून सर्व वस्तूंची प्रवृत्ति,हे जाणून शहाणे पुरुष भावयुक्त होत्साते मला भजत असतात.**

तरी , मीचि एक सर्वां । या जगा जन्म , पांडवा ! ।
आणि मजचिपासूनि , आघवा । निर्वाहो यांचा ।।112।।
कल्लोळमाळा अनेगा , । जन्म जळीचि , पै गा ! ।
आणि तयां , जळचि आश्रयो, तरंगा । जीवनही जळ ।।113।।
ऐसें , आघवाचि ठायी , । तया जळचि जेवी पाही ।
तैसा , मी वाचूनि नाही । विश्वी इये ।।114।।
ऐसिया व्यापका माते । मानूनि , जे भजती भलतेथे ।
परि , साचोकारे उदिते [1] । प्रेमभावे ।।115।। 1 यथार्थस्वरूप ज्ञान होऊन
देश , काळ ,वर्तमान , । आघवे मजसी करूनि अभिन्न ।
जैसा , वायु होऊन गगन ,। गगनीचि विचरे [2] ।।116।। 2 संचार करितो
ऐसेनि जे निजज्ञानी , । खेळत सुखे त्रिभुवनी , ।
जगद्रुपा, मनी, । साठऊनि माते ।।117।।
जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।
हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ।।118।।

**मच्चित्ता मद्‌गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।**
**कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।।9।।**

**माझ्या ठिकाणी चित्त लावून,व माझ्या ठायी जीवप्राण ठेवून,एकमेकाला बोध करीत व माझ्या कथा सांगत त्यातच नेहमी संतुष्ट असतात.**

चित्ते मीचि जाहाले , । मियाचि , प्राणे धाले [3]। 3 तृप्त होणे
जीवो , मरो [4] , विसरले । बोधाचिया भुली ।।119।। 4 जीवन मरण
मग तया बोधाचेनि माजे , । नाचती संवादसुखाची भोजें [5] । 5 आनंद
आतां , एकमेका घेपे , दीजे । बोधचि वरी ।।120।।
जैशी,जवळिकेची सरोवरे,। उचंबळलिया,कालवती परस्परे,।
मग तरंगासी धवळारे [6] , । तरंगचि होती ।।121।। 6 घर
तैसी, येरयेरांचिये मिळणी , । पडत आनंद कल्लोळाची वेणी [7] । 7 वेणी
तेथ , बोध बोधाची लेणी , । बोधेची मिरवी ।।122।।
जेसे , सूर्ये सुर्याते वोवाळिले । की ,चंद्रे , चंद्रम्या क्षेम दिधले , ।
ना तरी , सरिससेनि पाडे [8] मीनले । दोनी वोघ ।। 123।। 8 एकाच प्रकारचे
तैसें , प्रयाग होत सामरस्याचे , । वरी वोसाण [9] तरत सात्त्विकाचे । 9 पुराने वाहून आलेल्या वस्तु
ते संवाद चतुष्पथीचे [10] । गणेश जाहले ।।124।। 10 संवादरुपी चौक
तेंव्हा , तया महासुखाचेनि भरे , । धावोनि देहाचिये गावाबाहेरे , ।
मिया धाले , तेणे उद्गारे [11] । लागती गाजो ।।125।। 11 तृप्त झाल्याने

पै , गुरुशिष्यांचिया एकांती , । जे अक्षरा एकाची वदंती [1] । 1 मंत्राक्षर सांगतात
ते , मेघाचियापरी त्रिजगती । गर्जती सैध [2] ।।126।। 2 सगळीकडे
जैसी,कमळकळिका जालेपणे [3] । हृदयीचिया मकरंदाते राखो नेणे,। 3 पूर्ण उमलल्यानंतर
दे रायारंका पारणे । अमोदाचे ।।127।।
तैसेचि , माते विश्वी कथित , । कथितेनि तोषे , कथुं विसरत ।
मग तया विसरामाजी , विरत । आंगे , जीवे ।।128।।
ऐसें ,प्रेमाचेनि बहुवसपणे , ।नाही , राती दिवो जाणणे , ।
केले माझे सुख अव्यंगवाणे । आपणपेया जीही ।।129।।

**तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।**
**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ।।10।।**

**या प्रमाणे नेहमी युक्त म्हणजे समाधानाने राहून प्रीतिपूर्वक मला भजणाऱ्या लोकांस ते मला येऊन पोचतील असा समत्व बुद्धीचा योग मीच देत असतो.**

तया मग जे आम्ही कांहीं । द्यावे , अर्जुना ! पाही ! ।
ते ठायीचीच [4] तिही । घेतली सेल [5] ।। 130 ।। 4 त्या गोष्टीचा 5 उत्तम भाग
कां , जे ते जिया वाटा ।निगाले गा सुभटा ! ।
ते सोय [6] पाहोनि , अव्हाटा । स्वर्गापवर्ग [7] ।।131।। 6 मार्ग 7 मोक्ष
म्हणौनि , तिही जे प्रेम धरिले , । तेचि , आमुचे देणे उपाइले [8] । 8 या उपायाने प्राप्त करून
परि आम्ही देयावे , हेही केले । तिहीची , म्हणिपे ।।132।। घेतलेले
आतां , यावरी येतुले घडे , । जे , तेचि सुख आगळे वाढे , ।
आणि , काळाची दृष्टि न पडे , । हे , आम्हां करणे ।।133।।
लळेयाचिया बाळका , किरीटी ! । गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी , ।
जैसी खेळता , पाठोपाठी , । माउली धावे ।। 134 ।।
ते , जो , जो खेळ दावी , । तो , तो , पुढे सोनयाचा करुनि ठेवी ।
तैसी उपास्तीची पदवी[9] ।पोषित [10]मी जाये ।।135।। 9 उपासनेची आवड 10 वाढवतो
जिये पदवीचेनि पोषके , । ते माते पावती यथासुखे , ।
हे पाळती [10] ,मज ,विशेखे [11] ।आवडे [12] करु ।।136।। 10 पाळतील 11 ज्ञान
पै गा ! भक्तासि माझे कोड , । मज , तयाचे अनन्यगतीची चाड । 12 आवडते
कां , जे प्रेमळांचे सांकड [13] । आमुचिया घरी ! ।।137।। 13 दुष्प्राप्यता
पाहे पां ! स्वर्ग,मोक्ष उपाइले [14] । दोन्ही मार्ग,तयाचिये वाहणी[15] केले। 14 प्रसिद्ध 15 सेवेला
आम्ही आंगही शेखी वेचिले । लक्ष्मियेसी [16]।।138 ।। लावतो 16 लक्ष्मीसकट
परि , आपणपेवीण [17]जे एक । ते ,तैसेचि सुख साजुक । 17 देहापासून वेगळे
सप्रेमळलागी देख , । ठेविले जतन[18] ।। 139।। 18वेगळे राखून ठेवले

हा ठायवरी , किरीटी ! ।आम्ही प्रेमळु घेवो आपणयासाठी ।
या बोली बोलिजत गोष्टी , । तैसिया नव्हती गा ! ।।140।।

**तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः ।**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ।।11।।**
**आणि त्यावर अनुग्रह करण्यासाठीच मी त्यांच्या आत्मभावात म्हणजे अंतःकरणात शिरुन तेजस्वी ज्ञानदीपाने त्यांच्या मनात अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या अंधकाराचा नाश करितो.**

म्हणौनि ,मज आत्मयाचा भावो , ।जिही , जियावया केला ठावो , ।
एक मीवाचूनि , वावो । येर , मानिले जिही , ।।141।।
तया तत्वज्ञां चोखटा । दिवी [1]पोतासाची [2] सुभटा ! ।
मग मीचि होऊनि दिवटा [3] । पुढा , पुढा चाले । ।142।।
अज्ञानाचिये राती-।माजी , तमाचि मिळणी दाटती ।
ते नाशूनि घाली परौती [4] , । तया करी नित्योदयो ।।143।।
ऐसे प्रेमळाचेनि प्रियोत्तमे , । बोलिले जेथ , पुरुषोत्तमे , ।
तेथ अर्जुन मनोधर्मे। ' निवालो ' म्हणतसे ।।144।।
' हां , हो जी अवधारा ! । भला केरु फेडिला संसारा ।
जाहलो जननीजठरजोहरा-। वेगळा , प्रभु ! ।। 145।।
जी , जन्मलेपण आपुले [5], ।हे , आजि मिया डोळा देखिले ।
जीवित हाता चढले [6]। आवडतसे ।।146।।
आजि आयुष्या उजवण [7] जाहली । माझिया दैवा दशा उदयली ।
जे , वाक्यकृपा लाधली । दैविकेनि मुखे ।।147।।
आतां , येणे वचन तेजाकारे , । फिटले आतील बाहेरील आंधारे , ।
म्हणौनि , देखतसे साचोकारे । स्वरुप तुझें ।।148।।

[1] मशाल [2] कापसाची
[3] मशालजी
[4] पलीकडे
[5] जन्मल्याचे मर्म
[6] जन्मल्याचे सार्थक झाले
[7] सफलता

**अर्जुन उवाच**
**परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।**
**पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ।।12।।**
**अर्जुन म्हणाला तुम्हीच परम ब्रह्म,श्रेष्ट स्थान व पवित्र वस्तु आहा; दिव्य व शाश्वत पुरुष , आदिदेव,अजन्मा,सर्वविभु म्हणजे सर्वव्यापी असे**

तरी , होसी गा ! तूं परब्रह्म । जे या महाभूता विसंवते धाम ।
पवित्र तू परम । जगन्नाथा ! ।। 149 ।।

तू परम दैवत तिही देवा[1] , । तू पुरुष जी पंचविसावा [2] , । 1 ब्रह्मा,विश्णु व महेश
दिव्य तू प्रकृतिभावा-।पैलीकडील ।। 150।। 2 25वे तत्व जो पुराणपुरुष
अनादिसिद्ध तू स्वामी । जो, नाकळिजसी जन्मधर्मी ।
तो तू , हे आम्ही । जाणितले आतां ।।151।।
तू या कालत्रयासि सूत्री , । तू जीवकळेची अधिष्ठात्री ।
तू ब्रह्मकटाहधात्री [3] । हे कळले फुडे ।।152।। 3 कढई

**आहुस्त्वामृषयः सर्वे देवार्षिर्नारदस्तथा ।**
**असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ।।13।।**
**तुम्हाला सर्व ऋषि,तसेच देवर्षि,नारद,असित,देवल आणि व्यासहि म्हणतात; आणि स्वतः तुम्हीहि मला तेच सांगता.**

पै , आणिकही एक परी । इये प्रतीतीची येतसे थोरी ।
जे , मागे ऐसेचि ऋषीश्वरी । सांगितले तूते [4] ।।153।। 4 तुझे स्वरूप
परि,तया सांगितलियाचे साचपण,। हे, आता माझे देखतसे अंतःकरण ।
जे , कृपा केली आपण , । म्हणौनि देवा ! ।।154।।
एऱ्हवी , नारदु अखंड जवळां ये , । तोही ऐसेचि वचनी गाये , ।
परि ,अर्थ न बुजोनि ठाये [5] , । गीतसुखचि ऐको ।।155।। 5 अर्थ न समजून घेता
जी आंधळेयांच्या गावी , । आपणपे प्रगटले रवी , । समाधान होत होते
तरी तिही , वोतपलीचि [6] घ्यावी । वाचूनि, प्रकाशु कैचा ?।।156।। 6 उष्णताच अनुभवावी
परि,देवर्षि अध्यात्म गाता, । आहाच [7] रागांगेसी जे मधुरता,। 7 वरवरची
तेचि फावे[8] , येर चित्ता । नलगेचि कांही ।।157।। 8 मिळत होते
पै , असिता , देवलाचेनि मुखे । मी एवंविधा [9] तूते आइके , । 9 या स्वरुपाचे
परी , तै बुद्धि विषयविखे । घारिली [10] होती ।।158।। 10 व्यापली
विषयविषाचा पडिपाडु [11] । गोड, परमार्थु , लागे कडू । 11 जोर
कडु विषय , तो गोडु । जीवासी जाहला ।।159।। 12 घरी
आणि हे आणिकांचे काय सांगावे ?।राउळा [12],आपणचि येऊनि व्यासदेवे ।
तुझे स्वरुप आघवे । सर्वदा सांगिजे ।।160।।
परि , तो अंधारी चिंतामणी देखिला । जेवीं , ' नव्हे या बुद्धी ', उपेक्षिला ।
पाठी दिनोदयी , वोळखिला ,।' होय ', म्हणौनि ।।161।।
तैसी , व्यासादिकांचीबोलणी । तिया ,मजपाशी , चिद्रत्नाचिया खाणी ।
परि , उपेक्षिल्या जात होतिया , तरणी[13] ।तुजवीण , कृष्णा ! ।।162।। 13 प्रकाशक सूर्य

**सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।**
**न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ।।14।।**

**हे केशवा!तुम्ही मला जे हे सांगता,ते सर्व मी सत्य मानितो. भगवन्! तुमची व्यक्ती म्हणजे तुमचे मूळ , देवांना माहीत नाही आणि दैत्यांना माहीत नाही.**

ते आतां,वाक्यसूर्यकर [1] तुझे फांकले । आणि,ऋषी,मार्ग होते जे कथिले,।
तया , आघवियांचेचि फिटले । अनोळखपण ।।163।। — 1 सूर्य किरण
जे ज्ञानाचे बीज,तयांचे बोल,। माजी हृदय भूमिके पडिले सखोल , ।
वरी,इये कृपेची जाहाली वोल । म्हणौनि , संवादफळेंशी उठले ।। 164।।
अहो ! नारदादिकां संता । त्यांचिया उक्तिरुप सरिता ।
मी महोदधी जाहलो , अनंता ! । संवादसुखाचा ।।165।।
प्रभु ! आघवेनि येणे जन्मे , । जिये पुण्ये केली मिया उत्तमे , ।
तयांची, न ठकतीचि [2] , अंगी [3] , कामे । सदगुरु तुवा ।।166।। — 2 (फळे) शिल्लक राहत नाहीत 3 स्विकारला
एऱ्हवी , वडिलवडिलांचेनि मुखे , । मी सदा तूते कानी आइके ।
परि , कृपा न कीजेचि तुवा एके , । तंव , नेणवेचि कांही ।।167 ।।
म्हणौनि , भाग्य जै सानुकुळ । जालिया , केले उद्यम सदा सफळ ।
तैसें , श्रुताधीत [4] सकळ ।गुरुकृपा साच ।।168।। — 4 शास्त्र ऐकलेला व पढलेला
जी,बनकरु [5] झाडे सिंपी जीवेसाटी [6] । पाडूनि ,जन्मे [7],काढी[8] ,आटी [9],। — 5 माळी 6 जीवापाड 7 लावतो
परि , फळेंसि तैंचि भेटी । जै , वसंतु पावे ।।169।। — 8 तण काढतो,9 छाटतो
अहो , विषमा [10] जै वोहट पडे , । तै , मधूर ते मधूर आवडे । — 10 ज्वर
पै ,रसायने तै गोडे , । जै , आरोग्य देही ।।170।।
कां , इंद्रिये , वाचा , प्राण । यां जालियांचे , तैंचि सार्थकपण, ।
जै , चैतन्य येऊनि , आपण । संचरे माजी ।।171।।
तैसें,शब्दजात आलोडिले [11] । अथवा योगादिक जे अभ्यासिले , । — 11 अध्ययन करणे
ते , तैंचि म्हणो ये आपुले , । जै , सानुकुल श्रीगुरु ।।172।।
ऐसिये जालिये प्रतीतीचेनि [12] माजे।अर्जुन निश्चयाचि नाचतुसे भोजे । — 12 अनुभव
तेवीचि म्हणे , ' देवा ! तुझे । वाक्य मज मानले ।।173।।
तरि साचचि हे कैवल्यपती ! । मज त्रिशुद्धी आली प्रतीती ।
जे , तू , देवदानवांचिये मती-।जोगा नव्हसी।।174।।
तुझे वाक्य व्यक्ती [13] न येता,देवा ! । जो आपुलिया जाणे जाणिवा,[14]। — 13 स्पष्ट 14 आपल्या ज्ञानाचे
तो कहीचि नोहे , हे मद्भावा । भरवसेनि आले ।।175।। — बळावर जाणु पाहिल

**स्वयमेवाऽऽत्मनाऽऽत्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।**
**भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ।।15।।**

**हे सर्व भूते उत्पन्न करणाऱ्या भूतेशा ! देवदेवा जगत्पते ! तुम्ही हे पुरुषोत्तमा ! स्वतःच आपण आपल्याला जाणिता.**

एथ आपुले वाढपण [1] जैसे , ।आपणचि जाणिजे आकाशे ।                1 विस्तार
कां , मी येतुली घनवट , ऐसें । पृथ्वीचि जाणे ।176।।
तैसा , आपुलिये सर्वशक्ती , । तुज तूचि जाणसी , लक्ष्मीपती ! ।
येर वेदादिक मती । मिरवती , वायां ।।177।।
हां गा ! मनाते मागां सांडावे [2] ,। पवनाते वावी मवावे [2] ।                2 हरवावे 3 हाताने मोजावे
आदिशून्य तरोनि जावे । केउते बाही ?।।178।।
तैसे , हे तुझे जाणणे आहे । म्हणौनि , कोणाही ठाउके नोहे ।
आतां , तुझे ज्ञान होये , । तुजचि जोगे ।।179।।
जी ! आपणयाते तूचि जाणसी । आणिकाते सांगावयाही समर्थ होसी ।
तरी , आता एक वेळ घाम पुसी । आर्तीचिये निडळीचा [4] ।।180।।          4 इच्छारुपी कपाळाचा
हे आइकिले की , भूतभावना ! । त्रिभुवन गज पंचानना ! ।
सकळदेवदेवतार्चना ! । जगन्नायका ! ।।181।।
जरी थोरी तुझी पाहात आहो । तरी,पासी उभे टाकावयाही योग्य नोहो ।
या शोच्यता [5] ,जरी विनवू बिहो,। तरी आन उपायो नाही ।।182।।          5 विचाराच्या संकोचाने
भरले समुद्र सरिता चहूकडे । परि , ते बापियासि [6] कोरडे ।          6 चातक
कां , जै मेघौनि थेंबुटा पडे , । तै , पाणी की तया ! ।।183।।
तैसें , श्रीगुरु सर्वत्र आथी , । परि कृष्णा ! आम्हा तूचि गती ।
हे असो , मजप्रती । विभूती सांगे ।।184।।

**वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ।।16।।**
**म्हणून तुमच्या ज्या दिव्य विभूति आहेत, ज्या विभूतीनी हे सर्व लोक व्यापून तुम्ही राहिला आहां, त्या आपणच मला कृपा करुन पूर्णपणे सांगा.**

जी तुझिया विभूती आघविया । परी , व्यापिती शक्ती दिव्या जिया ।
तिया , आपुलिया दावाविया । आपण मज ।।185।।
जीही विभूती ययां समस्ता । लोकाते व्यापूनि आहासी , अनंता ! ।
तिया प्रधाना , नामांकिता । प्रगटा करी ।।186।।

**कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।**
**केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ।।17।।**
**हे योगिन् ! सदा तुमचे चिंतन करीत असता तुम्हाला मी कसे ओळखावे?आणि हे भगवन्! कोणकोणत्या पदार्थांमध्ये मी तुमचे चिंतन करावे?ते मला सांगा.**

जी कैसे मिया जाणावे ?। काय जाणोनि सदा चिंतावे ?।
जरी , तुचि म्हणो आघवे , । तरि चिंतनचि न घडे ।।187।।
म्हणौनि , मागा भाव जैसे । आपुले , सांगितले तुवा उद्देशे ,[1] । 1 संक्षेपाने
आता विस्तारोनि तैसे , । एक वेळ बोले ।।188।।
जया जया भावाचिया ठायी । तूते चिंतिता , मज सायासु नाही ।
तो, विवळ [2] करुनि देई । योगु आपुला ।।189।। 2 स्पष्ट

**विस्तरेणाऽऽत्मनो योगं विभूतिं च जनार्दन ।**
**भूयः कथय तृप्तिर्हि श्रृण्वतो नास्ति मेऽमृतम् ।।18।।**
**हे जनार्दना!आपली विभूति व योग पुनः मला विस्ताराने सांगा;कारण,अमृततुल्य हे तुमचे भाषण ऐकिता ऐकिता माझी तृप्ती होत नाही.**

आणि पुसलिया जिया विभूती । त्याही बोलाविया भूतपती ।
येथ म्हणसी जरी , ' पुढती । काय सांगो ? ' ।।190।।
तरी हा भाव मना । झणे जाय हो, जनार्दना ! ।
पै , प्राकृताही [3] , अमृतपाना । ना न म्हणवे जेवीं ।।191।। 3 सामान्य
जे काळकूटाचे सहोदर , ।जे मृत्युभेणे प्याले , अमर ,।
तरी दिहाचे पुरंदर [4] । चौदा जाती ।।192।। 4 इंद्र
ऐसा,कवण एक क्षीराब्धीचा रसु ?। जया,वायाचि अमृतपणाचा आभासु ।
तयाचाही मीठांशु [5] । जें , ' पुरे ' म्हणो नेदी ! ।।193।। 5 गोडी
तया पाबळेयाही [6] , येतुलेवरी । गोडियेचि आथि थोरी । 6 हलक्या
मग , हे तव अवधारी , । ' परमामृत ' साचे ! ।।194।।
जें , मंदराचळु न ढाळितां । क्षीरसागरु न डहुळिता ।
अनादि स्वभावता । आइते आहे ।।195।।
जे द्रव ना , नव्हे बद्ध । जेथ नेणिजती रस गंध ।
जे , भलतयाही सिद्ध । आठवलेचि , फावे ।।196।।
जयाची गोठीचि ऐकतखेवो , । आघवा संसारु होय वावो ।
बळिया , नित्यता लागे येवो । आपणपेया ।।197।।
जन्ममृत्युची भाख [7] । हारपोनि जाय निःशेख । 7 भाषा
आत बाहेरी , महासुख । वाढोचि लागे ।।198।।
मग , देवगत्या जरी सेविजें । तरी ते आपणचि होऊनि ठाकिजे ।
ते तुज देता चित्त माझें ,। पुरे म्हणो न शके ।।199।।
तुझे नामचि आम्हा आवडे । वरि भेटी होय , आणि जवळिक जोडे ।
पाठी गोठी सांगसी , सुरवाडे [8] । आनंदाचेनी ।।200।। 8 रंगुन जाणे

आतां,हे सुख कायिसयासारिखे ?। काही निर्वचेना [1] मज ,परितोखे [2] ।
तरि येतुले जाणे ,जे येणे मुखे । पुनरुक्तही हो ।।201।।
हां गा , सूर्य काय शिळा ! । अग्नि म्हणो येत आहे वोविळा [3]! ।
कां , नित्य वाहतया गंगाजळा , । पारसेपण असे ! ।।202।।
तुवां स्वमुखे जे बोलिले । हें , आम्ही नांदासि रूप देखिले ।
आजि चंदनतरुची फुले । तुरंबीत आहो मां ।।203।।
तया पार्थाचिया बोला । सर्वांगे श्रीकृष्ण डोलला ।
म्हणे , ' भक्तिज्ञानासि जाहला । आगरु [4] हा ' ।।202।।
ऐसा पतिकराचिया [5] तोषा आंतु । प्रेमाचा वेगु उचंबळतु ।
सायासे सांवरूनि , अनंतु ! । काय बोले ?।।205।।

1 निर्णय होत नाही
2 आनंदाने
3 ओवळा
4 मळा
5 आवडता

**श्रीभगवानुवाच**

**हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ।**
**प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ।।19।।**

**श्रीभगवान म्हणाले बरे; तर आता ज्या माझ्या दिव्य विभूति आहेत त्यापैकी हे कुरुश्रेष्ठा! मुख्य मुख्य तुला सांगतो; कारण माझ्या विस्ताराला अंत नाही.**

मी पितामहाचा पिता । हे आठविताही , नाठवे चित्ता ।
कीं , म्हणतसे , ' बा पंडुसुता ! । भले केले ' ।।206।।
अर्जुनाते बा म्हणे , एथ कांही । आम्हा विस्मो करावया कारण नाही ।
आंगे , तो लेकरु काइ ।नव्हेचि नंदाचे ? ।।207।।
परि प्रस्तुत ऐसे असो ; । हे करवी आवडीचा अतिसो ।
मग म्हणे , ' आइके ! सांगतसो । धनुर्धरा ! ' ।।208।।
तरी तुवा पुसलिया विभूती । तयाचे अपारपण सुभद्रापती ! ।
ज्या माझियाचि परि , माझिये मती । आकळती ना ।।209 ।।
आंगीचिया रोमा किती । जयाचिया तयासि न गणवती ।
तैसिया माझिया विभूती । असंख्य मज ।।210।।
एऱ्हवी,तरी मी कैसा ? केवढा ? ।म्हणौनि,आपणपयाही नव्हेचि फुडा [6] । 6 स्पष्ट
यालागी , प्रधाना जिया रुढा , । तिया आइके ।।211।।
जिया जाणतलियासाठी , । आघवीया जाणवतील किरीटी ! ।
जैसे , बीज आलिया मुठी । तरुचि आला होय ।।212।।
का , उद्यान हाता चढिन्नले । तरी अपैसी सापडली फळे , फुले ।
तेवी , देखिलिया जिया , देखवले । विश्व सकळ ।।213 ।।
एऱ्हवी , साचचि गा धनुर्धरा ! । नाही शेवटु माझिया विस्तारा ।
पै ,गगना ऐशिया अपारा । मजमाजी लपणे ।।214।।

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।**
**अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ।।20।।**
**सर्व भूतांच्या अंतरी असणारा आत्मा,हे गुडाकेशा! मी; आणि सर्व भूतांचा आदि,मध्य, व अंतहि मी.**

' आईके कुटिलालकमस्तका [1] ! । धनुर्वेदत्र्यंबका[2] ! ।
मी आत्मा असे एकैका । भूतमात्राच्या ठायी ।।215।।
आंतुलीकडे,मीचि यांचे अंतःकरणी,। भूताबाहेरी ,माझीच गवसणी ।
आदि मी , निर्वाणी । मध्यही मीचि ।।216।।
जैसे ,मेघा या तळी , वरी । एक आकाशचि आत बाहेरी ।
आणि , आकाशीचि जाले , अवधारी , । असणेही , आकाशी ।।217।।
पाठी , लया जे वेळी जाती , । ते वेळी , आकाशचि होऊनि ठाती ।
तेवी, आदि , स्थिती , गती , । भूतासि मी ।। 218 ।।
ऐसे बहुवस[3] आणि व्यापकपण । माझे विभूतियोगे जाण ।
तरी जीवचि करुनि श्रवण । आइकोनि , आइक ।।219।।
याहीवरी , त्या विभूती । सांगणे ठेले [4] सुभद्रापती ! ।
सांगेन म्हणितले तुजप्रती । त्या , प्रधाना आइके ।।220।।

1 मस्तकावर कुरळे केस असणारा
2 धनुर्विद्येत दुसरा शंकर असा
3 नानाविध
4 सांगणे राहुनच गेले

**आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।**
**मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ।। 21।।**
**बारा आदित्यांपैकी विष्णु मी;तेजस्व्यामध्ये किरणमाली सूर्य;सात किंवा एकुणपन्नास मरुतात मरीचि मी आहे.नक्षत्रात चंद्र मी आहे**

हे बोलोनि तो कृपावंतु । म्हणे ,' विष्णु मी आदित्यांआंतु ।
रवी मी , रश्मिवंतु । सुप्रभांमाजी ।। 221।।
मरुद्गणांच्या वर्गी , ।मरीचि म्हणे मी शाङर्गी ।
चंद्रु मी गगनरंगी । तारामाजी ।। 222।।

**वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ।**
**इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ।।22।।**
**मी वेदांपैकी सामवेद आहे;देवांपैकी इंद्र आहे;आणि इंद्रियांमध्ये मन आहे;भूतांच्या ठायी चेतना म्हणजे प्राणाची हालचाल मी आहे.**

वेदांआंतु , सामवेदु । तो मी म्हणे गोविंदु ।
देवामाजी मरुद्बंधु । महेंद्रु तो मी ।।223।।

इंद्रियामाजी अकरावे । मन , ते मी , हे जाणावे ।
भूतामाजी स्वभावे । चेतना ते मी ।।224।।

**रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।**
**वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ।।23।।**
**आणि अकरा रुद्रामध्ये शंकर मी आहे; यक्षराक्षसांत कुबेर ;आठ वसू मध्ये पावक मी आहे; सात पर्वतात मेरु मी .**

अशेषाही रुद्रांमाझारी। शंकर , जो मदनारी [1] ,।
तो मी , येथ न धरी । भ्रांति कांहीं ।।225।।
यक्षरक्षोगणांआंतु , । शंभुचा सखा , जो धनवंतु ।
तो कुबेरु मी हे अनंतु । म्हणता जाहला ।। 226।।
मग आठाही वसूमाझारी । पावकु तो मी अवधारी ।
शिखराथिलिया [2] सर्वोपरी । मेरु तो मी ।।227।।

1 मदनाचा शत्रु
2 शिखर असलेल्यांमध्ये

**पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।**
**सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ।।24।।**
**महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ।**
**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ।।25।।**
**हे पार्था! आणि पुरोहितामध्ये मुख्य जो बृहस्पति तो मी आहे असे समज. सेनानायकात मी स्कंद, जलाशयामधला समुद्र मी आहे. महर्षीपैकी भृगु मी; वाणीमध्ये एकाक्षर म्हणजे ॐकार मी आहे. यज्ञापैकी जपयज्ञ मी आहे, स्थावर म्हणजे स्थिर पदार्थात हिमालय.**

जो स्वर्गसिंहासना सावावो [3] । सर्वज्ञते आदीचा ठावो ।
तो पुरोहितामाजी रावो । बृहस्पती मी ।।228।।
त्रिभुवनीचिया सेनापती-।आंत , स्कंदु तो मी महामती ! ।
जो , हरवीर्ये अग्निसंगती । कृत्तिकाआंतु जाहला ।।229।।
सकळिका सरोवरासी । माजी , समुद्र तो मी जळराशी ।
महर्षीआतु तपोराशी । भृगु तो मी ।।230।।
अशेषाही वाचा-।माजी , नटनाच [4] सत्याचा ।
ते अक्षर एक मी , वैकुंठीचा। वेल्हाळु [5] म्हणे ।।231।।
समस्ताही यज्ञांच्या पैकी । जपयज्ञु मी ये लोकी ।
जो कर्मत्यागे , प्रणवादिकी । निफजविजे ।।232।।

3. मदत करणारा
4 उत्कर्ष
5 प्रिय

नामजपयज्ञु तो परम ,।बांधू न शके स्नानादि कर्म ।
नामे , पावन धर्माधर्म । नाम , परब्रह्म वेदार्थे ।।233।।
स्थावरां गिरीआंतु । पुण्यपुंज जो हिमवंतु ।
तो मी , म्हणे कांतु । लक्ष्मियेचा ।।234।।

**अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।**
**गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनि ः ।।26।।**
**उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।**
**ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ।।27।।**

**सर्व वृक्षांध्ये अश्वत्थ म्हणजे पिंपळ,देवर्षीमध्ये नारद; गंधर्वापैकी चित्ररथ; सिद्धापैकी कपिलमुनी. घोड्यात अमृतमंथनाचे वेळी निघालेला उच्चैश्रवस् मी आहे . गजेद्रापैकी ऐरावत;व मनुष्यात राजा.**

कल्पद्रुम [1] , हन ,पारिजातु ।गुणे , चंदनुही वाड [2] विख्यातु । 1 कल्पवृक्ष 2 खूप
तरि ययां वृक्षजाताआतु , । अश्वत्थु तो मी ।।235।।
देवऋषीआतु पांडवा ! । नारदु तो मी जाणावा ।
चित्ररथु मी , गंधर्वा । सकळिकामाजी ।।236।।
ययां , अशेषाही सिद्धां-।माजी , कपिलाचार्यु मी प्रबुद्धा ! ।
तुरंगजाता [3] प्रसिद्धां-।आंत , उच्चैःश्रवा मी ।।237।। 3 घोड्यांमध्ये
राजभूषण गजांआंतु । अर्जुना ! मी गा ऐरावतु ।
पयोराशी सुरमथितु । अमृतांशु तो मी ।।238।।
ययां नरांमाजी राजा । तो विभूतिविशेष माझा ।
जयाते सकळ लोक , प्रजा । होऊनि सेविती ।।239।।

**आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।**
**प्रजनश्चास्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ।।28।।**
**अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।**
**पितृणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ।।29।।**

**आयुधांत वज्र मी;गाईध्ये कामधेनु मी आहे;प्रजोत्पादन करणारा काम मी आहे; सर्पापैकी वासुकी मी आहे.आणि नागांमध्ये अनंत मी आहे; यादस् म्हणजे जलवासी भूतात वरुण मी; आणि पितरांत अर्यमा मी आहे; नियमन करणाऱ्यात यम मी.**

पै , आघवेयां हातियेरां-।आत , वज्र ते मी धनुर्धरा ! ।
जे , शतमखोत्तीर्णकरा [4] । आरूढोनि असे ।।240।। 4 इंद्राच्या हातात

धेनुमध्ये कामधेनु । ते मी म्हणे विष्वक्सेनु ।
जन्मवितयाआंत मदनु ।तो मी , जाणे ।।241।।
सर्पकुळाआंत अधिष्ठाता । वासुकी गा मी , कुंतीसुता ! ।
नागामाजी समस्ता । अनंतु तो मी ।।242।।
अगा ! यादसांआंतु [1] । जो पश्चिम प्रमदेचा कांतु , । 1 जलचर
तो वरुण मी , हे अनंतु । सांगत असें ।।243।।
आणि पितृगणां समस्ता-। माजी , अर्यमा जो पितृदेवता ।
तो मी हे तत्त्वता [2] । बोलत आहे ।।244।। 2 खरोखर
जगाची शुभाशुभे लिहिती,। प्राणियांच्या मानसांचा झाडा घेती,।
मग केलियानुरुप होती । भोगनियम जे ।।245।।
तया नियमितयामाजी यमु । जो कर्मसाक्षी धर्मु , ।
तो मी , म्हणे आत्मारामु । रमापती ।।246।।

**प्रऱ्हादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ।**
**मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ।।30।।**

**आणि दैत्यांपैकी प्रल्हाद मी आहे;ग्रासणाऱ्यात काल मी;आणि पशूंपैकी मृगेंद्र म्हणजे सिंह मी आणि पक्ष्यात गरुड.**

अगा दैत्यांचिया कुळी।प्रऱ्हादु , तो मी न्याहाळी ।
म्हणौनि , दैत्यभावादि मेळी । लिंपेचि ना ।। 247।।
पै ,कळितयामाजी [3] महाकाळु ।तो मी म्हणे गोपाळु । 3 हरण करणाऱ्यात
श्वापदामाजी शार्दूळू [4] । तो मी जाण ।।248।। 4 सिंह
पक्षिजातिमाझारी । गरुड तो मी , अवधारी ।
यालागी ,जो पाठीवरी ।वाहो शके माते ।।249।।

**पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।**
**झषाणां मकरश्चास्मि स्त्रोतसामस्मि जान्हवी ।।31।।**

**वेगवानात वायु मी आहे; शस्त्रधाऱ्यात राम मी; आणि माशांमध्ये नक्र मी आहे. नद्यात भागीरथी मी आहे.**

पृथ्वीचिया पैसारा-। माजी , घडी न लगता , धनुर्धरा ! ।
एकेचि उड्डाणे , साताहि सागरा-। प्रदक्षिणा कीजे ।।250।।
तयां , वहिलीया गतिमंता-। आंत [5] ,पवनु तो मी ,पंडुसुता ! । 5 वेगाने वाहणाऱ्यात
शस्त्रधरा समस्ता-। माजी , श्रीराम , तो मी ।।251।।

जेणे,सांकडलिया [1] धर्माचे कैवारे,। आपणपया,धनुष्य करुनि दुसरे,। 1.संकटात
विजयलक्ष्मिये , एक मोहरे [2] , । केले त्रेती ।।252।। 2 एकच मार्ग
पाठी , उभे ठाकूनि सुवेळी [3] । प्रतापलंकेश्वराची सीसाळी [4] । 3 सुवेळी पर्वत 4 मस्तक
गगनी उदो म्हणतया [5] , हस्तबळी [6] । दिधली भूता ।।253।। 4 भूतपीशांचाचे ओरडणे
जेणे देवांचा मानु गिवसिला , । धर्मासि जीर्णोध्दारु केला । 5 हातातला बळी
सूर्यवंशी उदेला, । सूर्य जो का ! ।।254।।
तो हातियेरुपरजितया आतु । रामचंद्र , मी , जानकीकांतु ।
मकर मी पुच्छवंतु । जळचरामाजी ।।255।।
पै , समस्ताही वोघा-।मध्ये , जे भागीरथे आणिता, गंगा ।
जन्हुने गिळिली , मग जंघा । फाडूनि दिधली ।।256।।
ते , त्रिभूवनैकसरिता ।जान्हवी , मी पंडुसुता ! ।
जळप्रवाहा समस्ता-। माझारी , जाणे ।।257।।
ऐसेनि वेगळाला सृष्टीपैकीं ।विभूती नाम सूतां [6] , एकेकी । 6सांगणे
सगळेन , जन्मसहस्त्रे ,अवलोकी । अर्ध्या नव्हती ।।258।।

**सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन ।**
**अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ।।32।।**
**अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ।**
**अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुख ः।।33।।**

**हे अर्जुना!सृष्टीमात्राचा आदि,अंत व मध्यहि मी;विद्यांपैकी अध्यात्मविद्या;वाद करणारांचा वाद मी.अक्षरापैकी अकार मी आहे;आणि सामासापैकी उभयपदप्रधान द्वंद्व; निमेषमुहूर्तादि अक्षय काल मीच;सर्वोतोमुख म्हणजे चारी बाजूनी मुखे असणारा धाता म्हणजे ब्रह्मदेव मी**

जैसी , अवघीचि नक्षत्रे वेचावी । ऐसी , चाड उपजेल जै जीवी , ।
तै , गगनाची बांधावी । लोथ [7] जेवी , ।।259।। 7 गाठोडे
कां,पृथ्वीये परमाणूचा उगाणा [8] घ्यावा । तरि,भूगोलुचि काखे सुवावा । 8 हिशोब
तेसा , विस्तारु माझा पहावा । तरि , जाणावे माते ।।260।।
जैसे ,शाखासी फूल ,फळ । एकिहेळा [9] वेटाळु म्हणिजे सकळ , । 9 एकदम
तरी , उपडूनिया मूळ । जेवी , हाती घेपे ।।261।।
तेवी , माझे विभूतिविशेष । जरी जाणो पाहिजेती अशेष , ।
तरी , स्वरुप निर्दोष । जाणिजे माझे ।।262।।
एऱ्हवी , वेगळालिया विभूती । कायि एक परिससी किती ? ।
म्हणौनि , एकिहेळा [10] महामती ! । सर्व मी , जाण ।।263।। 10 एकदाच

मी , आघवियेचि सृष्टी ।आदिमध्यांती , किरीटी ! ।
ओतप्रोत पटी । तंतु जेवी ।।264।।
ऐसिया व्यापका माते जै जाणावे , । तै , विभूतिभेदे काय करावे ? ।
परि , हे तुझी योग्यता नव्हे । म्हणौनि असो ; ।।265।।
कां , जे तुवा पुसिलिया विभूति । म्हणौनि , तिया आईक , सुभद्रापती ! ।
तरी , विद्यामाजी प्रस्तुती । अध्यात्मविद्या , ते मी ।।266।।
अगा ! बोलतयाचिया ठायी । वादु तो मी , पाही ! ।
जो , सकलशास्त्रसंमते कही । सरेचिना ! ।।267।।
जो निर्वचु जाता , वाढे । आइकतया , उत्प्रेक्षे [1] सळु [2] चढे । 1 कल्पनांना 2 जोर
जयावरी , बोलतयांची , गोडे । बोलणी होती ।।268।।
ऐसा, प्रतिपादनामाजी वादु । तो मी , म्हणे गोविंदु ।
अक्षरामाजी विशदु [3] , । अकारु तो मी ।। 269।। 3 शुध्द
पै , गा ! समासांमाझारी । द्वंद्व तो मी , अवधारी ।
मशका लागोनि ब्रह्मावेरी [4] । ग्रासिता , तो मी ।।270।। 4 ब्रह्मापर्यंत
मेरुमंदरादिकी सर्वी । सहित पृथ्वीते , विरवी ।
जो , एकर्णवातेही [5] जिरवी । जेथिचा तेथ ।।271।। 5 प्रलय काळातील समुद्र
जो , प्रळयतेजा देत मिठी , । सगळिया पवनाते गिळी किरीटी ! ।
आकाश जयाचिया पोटी । सामावले ।।272।।
ऐसा , अपार जो काळु , । तो मी म्हणे लक्ष्मीलीळु।
मग पुढती सृष्टीचा मेळु । सृजिता तो मी ।। 273।।

**मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।**
**कीर्तिः श्रीर्वाक च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ।।34।।**

**आणि सर्वांचा क्षय करणारा मृत्यु,व पुढे जन्मास येणाऱ्यांचे उत्पत्तिस्थान मी; स्त्रियांपैकी कीर्ति, श्री आणि वाणी,स्मृति,मेधा,धृति व क्षमा मी**

आणि सृजिलिया भूताते मीचि धरी । सकळां जीवनही मीचि अवधारी ।
शेखी सर्वांते या संहारी । तेंव्हा , मृत्युही मीचि ।।274।।
आता स्त्रीगणांच्या पैकी । माझिया विभूती सात आणिकी ।
तिया ऐक कवतिकी ।सांगिजतील ।।275।।
तरी नित्य नवी जे कीर्ति । अर्जुना ! ते माझी मूर्ती ।
आणि औदार्येसी जे संपत्ती । तेही मीचि जाणे ।।276।।
आणि ते गा ! मी वाचा ।जे सुखासनी न्यायाचा ।
आरुढोनि विवेकाचा । मार्गी चाले ।।277।।

देखिलेनि पदार्थे । जे आठवूनि दे माते ।
ते स्मृतिही एथे । त्रिशुद्धी [1] मी ।।278।। 1 निश्चयपूर्वक
पै ,स्वहिता अनुयायिनी ।मेधा ते गा ! मी इये जनी ।
धृती मी त्रिभूवनी । क्षमा ते मी ।।279।।
एवं , नारीमाझारी । या सातही शक्ति मी अवधारी ।
ऐसे संसारगजकेसरी । म्हणता जाहला ।।280।।

**बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ।**
**मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ।।35।।**
**तसेच साम म्हणजे गावयाच्या वैदिक स्तोत्रात बृहत्साम व छंदापैकी गायत्री छंद मी;महिन्यात मार्गशीर्ष मी;ऋतूत वसंत.**

वेदराशीचिया सामा-। आंत , बृहत्साम जे प्रियोत्तमा ! ।
ते मी , म्हणे रमा-। प्राणेश्वरु।।281।।
गायत्रीछंद जे म्हणिजे , । ते सकळां छंदामाजी माझें ।
स्वरूप , हे जाणिजे । निभ्रांत तुवा ।।282 ।।
मासांआत मार्गशीरु । तो मी , म्हणे शाङर्गधरु ।
ऋतूमाजी कुसुमाकरु । वसंतु , तो मी ।। 282 ।।

**द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।**
**जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ।।36।।**
**वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः ।**
**मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ।।37।।**
**फसविणाऱ्यांचे द्युत मी आहे;तेजस्व्यांचे तेज मी;विजयशाली पुरुषांचा विजय मी आहे; निश्चयी पुरुषांचा निश्चय मी आहे;सत्त्वशीलांचे सत्त्व मी. यादवांपैकी वासुदेव मी आहे ; पांडवांत धनंजय , मुनीपैकीहि व्यास मी; कवीमध्ये शुक्राचार्य कवि.**

छळितयां विंदाणा-। माजी [2] जूं [3] ते , मी विचक्षणा ! । 2 कारस्थान 3 जुगार
म्हणौनि , चोहटा चोरी , परी कवणा । निवारु न ये ।।284।।
अगा अशेषाही तेजसां-। आंत , तेज ते मी भरवंसा ।
विजयो मी कार्योद्देशां । सकळामाजी ।।285।।
जेणे चोखाळत दिसे न्याय ,। तो व्यवसायांत , व्यवसाय ।
माझे स्वरूप हे , राय ।सुरांचा म्हणे ।।286।।
सत्त्वाथिलियांआंतु [4] । सत्त्व मी म्हणे अनंतु । 4 सत्त्वशील संपन्न
यादवांमाजी श्रीमंतु । तोचि , तो मी ।।287।।

जो , देवकी-वसुदेवास्तव जाहला , । कुमारीसाठी गोकुळी गेला ।
तो मी , प्राणासकट पियाला । पूतनेते ।।288।।
नुघडता बाळपणाची फुली [1] ।जेणे मियां अदानवी सृष्टि केली। 1 मुद्रा
करी गिरी धरूनि , उमाणिली [2] । महेंद्रमहिमा ।।289।। 2 अवमानली
कालिदीचे ह्रदयशल्य फेडिले,। जेणे मिया जळत गोकुळ राखिले ।
वासरुवासाठी लाविले । विरंचीस [3] पिसे ।।290।। 3 ब्रह्मदेव
प्रथमदशेचिये पहाटे-। माजी कंसाऐशी अचाटे ।
महाधेंडी अवचटे । लीळाचि नासिली ।।291।।
हे काय कितीएक सांगावे ! । तुवाही देखिले , ऐकिले असे आघवे ।
तरि , यादवांमाजी जाणावे । हेचि स्वरूप माझें ।।292।।
आणि सोमवंशी तुम्हा पांडवा-। माजी , अर्जुन तो मी जाणावा ।
म्हणौनि , एकमेकाचिया प्रेमभावा । विघडु न पडे [4] ।। 293।। 4 वितुष्ट येत नाही
संन्यासी तुवा होऊनि जनी , । चोरूनि नेली माझी भगिनी , ।
तऱ्ही , विकल्पु नुपजे मनी । मी , तू , दोन्ही , स्वरूप एक ।।294।।
मुनीआत व्यासदेवो । तो मी , म्हणे यादवरावो ।
कवीश्वरामाजी धैर्या ठावो । उशनाचार्य , तो मी ।।295।।

**दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।**
**मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ।।38।।**
**शासन करणाऱ्यांचा दंड मी आहे;जयेच्छूची नीति म्हणजे मसलत मी आहे आणि गुह्यांपैकी मौन देखील मी आहे. ज्ञान्यांचे ज्ञान मी.**

अगा, दमितयामाझारी । अनिवार दंडु , तो मी अवधारी ।
जो , मुंगियेलागोनि ब्रह्मावेरी। नियमित पावे ।।296।।
पै ,सारासार निर्धारितया । धर्मज्ञानाचा पक्षु धरितया ।
सकळ शास्त्रामाजी ययां , । नीतिशास्त्र , ते मी ।।297।।
आघवियाचि गूढां-। माजी , मौन ते मी , सुहाडा [5]! । 5 राजा
म्हणौनि , न बोलतया पुढा। स्त्रष्टाही [6] नेण [7] होय ।।298।। 6 ब्रह्मदेव 7 अज्ञानी ठरतो
अगा ! ज्ञानियांचिया ठायी , । ज्ञान ते मी , पाही ! ।
आतां असो हें ; यया कांहीं । पार न देखो ।।299।।

**यच्चाऽपि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**
**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ।।39।।**
**नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ।**
**एष तुद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ।।40।।**

**तसेच हे अर्जुना!सर्व भूतांचे जे काही बीज ते मी;मला सोडून असेल असे चराचर भूत नाही. हे परंतपा! माझ्या दिव्य विभूतीना अंत नाही.विभूतींचा हा विस्तार केवळ दिग्दर्शनार्थ मी सांगितला आहे.**

पै , पर्जन्याचिया धारा ।वरी , लेख[1] करवेल धनुर्धरा ! । 1 गणना
कां , पृथ्वीचिया तृणांकुरा । होईल ठी[2] ।।300।। 2 मोजदाद
पै , महोदधीचिया तरंगा ।व्यवस्था[3] धरु नये , जेवी गा ! । 3 गणती
तेवी , माझिया विशेषलिंगा । नाही मिती ।।301।।
ऐशियाही सातपाच प्रधाना । विभूती सांगितलिया तुज अर्जुना ! ।
तो हा उद्देशु , जो गा ! मना । आहाच[4] गमला ।।302।। 4 वरवरचा
येरा विभूतिविस्तारासि , कांहीं, । एथ सर्वथा लेख नाही ।
म्हणौनि , परिससी तू , काई ।आम्ही सांगो किती ! ।।303 ।।
यालागी , एकिहेळा[5] , तुज । दाऊं आता वर्म निज । 5 एकदाच
तरी सर्व भूतांकुरे , बीज । विरुढत असे , ते मी ।।304।।
म्हणौनि ,साने ,थोर , न म्हणावे । उंच , नीच भाव सांडावे , ।
एक मीचि , ऐसे मानावे । वस्तुजाताते ।।305।।
तरी , यावरी साधारण । आईक पां ! आणिकही खूण ।
तरी , अर्जुना ! ते तू जाण । विभूति माझी ।।306।।

**यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोऽशसंभवम् ।।41।।**
**जी जी वस्तु वैभव,लक्ष्मी,किंवा प्रभाव यानी युक्त आहे ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली असेच तू समज.**

**जेथ , जेथ संपत्ति आणि दया ।दोन्ही , वसती आलिया ठाया , ।**
**ते , ते जाण धनंजया ! । विभूति माझी ।।307।।**

**अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।**
**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।।42।।**
**अथवा हे अर्जुना! तुला हा पसारा जाणून काय करावयाचे? थोडक्यात सांगतो मी आपल्या एकाच अंशाने हे सर्व जग व्यापून राहिलो आहे.**

अथवा , एकले एक बिंब गगनी । प्रभा फाके त्रिभुवनी ।
तेवी ,एकाकियाची ,सकळ जनी । आज्ञा पाळिजे ।।308।।

तयाते एकले झणी म्हण । तो निर्धन , या भाषा नेण ।
काय कामधेनूसवे सर्वस्व , हन ।चालत असे ? ।।309।।
तियेते , जे ,जेधवा , जो मागे , । ते , ते, एकसरेचि प्रसवो लागे ।
तेवी , विश्वविभव [1] तया आंगे , । होऊनि असती ।।310।। 1 विश्वातील ऐश्वर्य
तयाते वोळखावया , हेचि संज्ञा ।जे , जगे नमस्कारिजे आज्ञा ।
ऐसे आथि , ते जाण , प्राज्ञा ! । अवतार माझे ।।311।।
आणि , सामान्य , विशेष ।हे जाणणे , एथ महादोष ।
कां , जे मीचि एक अशेष । विश्व हे , म्हणौनि ।।312।।
तरी आता साधारण आणि चांगु । ऐसा कैसेनि पां कल्पावा विभागु ।
वाया आपुलये मती वंगु [2] । भेदाचा लावावा ! ।।313।। 2 व्यंग
एऱ्हवी , तूप कासया घुसळावे ?। अमृत कां , रांधूनि अर्धे करावे ? ।
हां गा ! वायूसि काय पां , डावे ,। उजवे आंग आहे ?।। 314।।
पै , सूर्यबिंबासि पोट , पाठी । पाहता , नासेल आपुली दिठी ।
तेवी , माझ्या स्वरूपी गोठी । सामान्यविशेषाची नाही ।।315।।
आणि सिनाना [3] इही विभूती । मज अपाराते मविसील [4] किती ? । 3 नाना प्रकारच्या 4 मोजणी
म्हणौनि , किंबहुना , सुभद्रापती ! ।असो हे जाणणे ; ।।316।।
आता पै , माझेनि एके अंशे । हे जग व्यापिले असें ।
यालागी , भेदु सांडूनि , सरिसे । साम्ये भज ।।317 ।।
ऐसे विबुधवनवसंते [5] ।तेणे , विरक्तांचेनि एकांते [6] । 5 मुमुक्षुना फुलवणारा
बोलिले जेथ श्रीमंते । श्रीकृष्णदेवे , ।। 318।। 6 विरक्तलोकांचे ध्येय
तेथ अर्जुन म्हणे ,' स्वामी ! ।येतुले हे राभस्य [7] बोलिले तुम्ही। 7 अविचाराचे भाषण
जे भेदु एक , आणि आम्ही । सांडावा , एकी [9] ।।319।। 8 ऐक्यासाठी
हां ,हो ! ,सूर्य म्हणे काय जगाते । अंधारे दवडा का परौते ! ।
तेवी धसाळ [9] म्हणो देवा तूते , । तरी , अधिक [10] , हा बोलु ।।320।। 9 अविचारी
तुझे नामचि एक कोण्ही वेळे । जयाचिये मुखासि कां,काना मिळे ,। 10 अपमानकारक
तयाचिया हृदयाते सांडूनि पळे । भेदु जी साच ! ।। 321।।
तो , तू परब्रह्मचि असके [11] । मज दैवे दिधलासि हस्तोदके । 11 संपूर्ण
तरी आता भेदु कायसा ? के ? । देखावा कवणे ? ।।322।।
जी चंद्रबिंबाचा गाभारा ।रिगालियावरीही , उबारा ! ।
परी , राणेपणे [12] शाङर्गधरा ! । बोला हे तुम्ही ' ।।323।। 12 मोठेपणा
तेथ, सावियाचि [13] परितोषोनि देवे । अर्जुनाते आलिंगिले जीवे । 13 सहजच
मग म्हणे , ' तुवा न कोपावे । आमुचिया बोला ।।324।।
आम्ही तुज भेदाचिया वाहाणी [14] । सांगितली जे विभूतीची कहाणी । 14 प्रकार
ते अभेदे काय अंतःकरणी । मानिली , की न मने ।।325।।

हेचि पाहावयालागी , । नावेक , बोलिलो बाहेरिसवडिया [1] भंगी [2] । 1 बाह्यदृष्टीने 2 रीत
तंव , विभूती तुज चांगी । आलिया बोधा ' ।।326।।
तेथ अर्जुन म्हणे देवे , । ' हे आपुले आपण जाणावे ।
परी देखतसे विश्व आघवे । तुवा भरले ' ।।327।।
पै , राया ! तो पंडुसुतु । ऐसिये प्रतीतीसि [3] जाहला वरितु । 3 अनुभवाला
या संजयाचिया बोला , निवांतु । धृतराष्ट्र राहे ।।328।।
की,संजयो दुखवलेनि अंतःकरणे । म्हणतसे ,' नवल नव्हे ? दैव दवडणे ? ।
हा जीवे धाडसा [4] आहे मी म्हणे,। तव,आतुही आंधळा ' ।।329।। 4 चांगला
परी असो हें ; तो अर्जुनु । स्वहिताचा वाढवितसे मानु ।
की याहीवरी , तया आनु ।धिवसा [5] उपनला [6] ।।330।। 5 नवीन इच्छा
म्हणे हेचि हृदया आतुली प्रतीती , । बाहेरी अवतरो का डोळ्याप्रती । 6 उपजली
इये आर्तीचिया पाउली , मती । उठती जाहली ।।331।।
मिया इहीच दोही डोळा , । झोंबावे विश्वरूपा सकळा ।
एवढी हांव , तो देवा आगळा[7] । म्हणौनि करी ।।332।। 7 खरा दैववान
आजि तो कल्पतरुची शाखा,। म्हणौनि,वांझोळे [8] न लगती देखा । 8 वांझ फुले
जे , जे , येईल तयाचि मुखा , । ते , ते , साचचि करितसे येरु ।।334 ।।
जो प्रऱ्हादाचिया बोला , । विषाहीसकट आपणचि जाहला , ।
तो सदगुरु असे जोडला । किरीटीसी ।।334।।
म्हणौनि,विश्वरुप पुसावयालागी,। पार्थ रिगता होईल कवणे भंगी [9] । 9 कोणत्या प्रकारे
ते सांगेन पुढिलिये प्रसंगी । ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा ।।335।।

**इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगो नाम दशमोऽ ध्यायः ।।10।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

1. हे श्रीगुरो! आपण ब्रह्मज्ञानाचा स्पष्ट निःसंदेह बोध करण्याचे बाबतीत चतुर आहात. ब्रह्मविद्यारुपी कमलास विकसित करणारे आहात. परा वाणीचा विषय जी स्वरुपस्थिती हीच कोणी एक तरुण स्त्री,तिच्याशी विलास करणारे आहात. आपणास माझा नमस्कार असो.
2. संसाररुप अंधकाराच नाश करणारे आपण सूर्य आहात. आपले निस्सीम व सर्वोत्कृष्ट सामर्थ्य आहे. जागृतादी अवस्थात्रयाहून श्रेष्ट चौथी तारुण्याची ज्ञानरुप अवस्था आहे. तारुण्यात त्या तुर्यावस्थेचे पालन करणे हा तुमचा लीलाविलास आहे. आपणास माझा नमस्कार असो.
3. सर्व जगाचे पालन करणारे आहात. कल्याणरुप रत्नांची खाण आहात. सज्जनरुपी वनातील चंदनासारखे श्रेष्ट आहात. तुम्ही आराधना करण्यास योग्य आहात.शिवलिग-स्वरूप आपण आहात त्या आपणास माझा नमस्कार असो.

4. भक्तांच्या चतुरचित्तरुपी चकोर पक्ष्यास आनंद देणाऱ्या चंद्रा,ब्रह्मानंदानुभवाच्या राजा, श्रुतीच्या तात्पर्य विषयीभूत ज्ञानाच्या सैद्धांतिक संग्रहरुपी समुद्रा,मदनासही गर्वहरण पूर्वक मोहित करणाऱ्या लोकोत्तर मदना, आपणास माझा नम्सकार असो.

5. शुद्ध भावयुक्त ज्ञानाच्या भजन भक्तीस पात्र आहात. संसाररुपी हत्तीचे गंडस्थळ फोडणारे सिंह आहात. जगत् उत्पत्तीचे आश्रयस्थान आहात. हे श्रीगुरुराया तुम्हाप्रत माझा नमस्कार असो.

20. जगात सर्वत्र शब्दांचे अरण्य माजले आहे. पण त्यात खरे अंतिम कल्याण करणारे फलप्रद असे एक अक्षर आढळणे दुर्मिळ आहे. परंतु तुम्ही मात्र माझ्या वाचेकडुन भगवद्गीतेचे व्याख्यान करवून माझ्या वाणीला,विवेकाची कल्पलता केली आहे.

32. नवव्या अध्यायाचा अभिप्राय इतका व्यापक व सखोल आहे की त्यास शिक्का करणे भीती वाटते. त्याचे मी सम्यक व्याख्यान केले असा गर्व मी कशास बाळगु असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

34. त्याप्रमाणे हें सर्वच अध्याय जरी गीतेचे आहेत तरी कांहीं अध्याय आपल्या जाणेपणाच्या गुणासह विरून गेल्यासारखे भासतात.